**रे. मु. नं. २७/२०२४**
**शेख रफिक वि. सै.जाबिर**
**निशाणी २३ खाली**

**<u>वादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ गणेशराव ज्ञानदेवराव ठाकरे याची पुढील सरतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>वादीतर्फे विधिज्ञ श्री. ए. आर. कट्टा यांच्यामार्फत</u> —**

प्रस्तुत प्रकरणी दाव्याच्या अनुषंगाने मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी २३ वर दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

२. मी आजरोजी अभिलेखावर निशाणी २२ सोबत दि. १८/०६/१९८३ रोजीचे खरेदीखताची प्रमाणीत प्रत अभिलेखावर दाखल करत आहे. सदर दस्त तीस वर्ष जुना असल्याने त्यातील मजकुर शाबित करण्याच्या अटीवर त्यास **निशाणी २४** देण्यात येते.

३. मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी २२ सोबत दि. १४/१२/१९८७ रोजीच्या खरेदी खताची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. सदर दस्त तीस वर्ष जुना असल्याने त्यातील मजकुर शाबित करण्याच्या अटीवर त्यास **निशाणी २५** देण्यात येते.

४. मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी २२ सोबत दि. २५/०१/१९९५ रोजीच्या खरेदी खताची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. सदर दस्त तीस वर्ष जुना असल्याने त्यातील मजकुर शाबित करण्याच्या अटीवर त्यास **निशाणी २६** देण्यात येते.

५. मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी २२ सोबत दि. ०५/१२/१९९८ रोजीच्या खरेदी खताची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. मी अभिलेखावर कच्चा लेआउट नकाशा दाखल केलेला आहे.

**( उर्वरित सरतपास वादीतर्फे तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपावेतो तहकुब )**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १७.०२.२०२६ (ए.ए. माळी)

अकोट २रे सह दिवाणी न्यायाधीश,

अकोट, जि. अकोला.